# डेटा गोपनीयता निवेदन आणि जॉब ॲप्लिकेशन डेटा (Job Application Data) वापरण्यासाठी संमती

आपली गोपनीयता Corning करिता महत्त्वाची आहे. Corning टॅलेंट कम्युनिटी मध्ये सामील होताना, उमेदवार प्रोफाईल तयार करताना किंवा Corning वेबसाईटद्वारे Corning येथे नोकरीसाठी अर्ज करताना आपण जी माहिती सादर करता ती Corning कशी वापरेल याबाबत आपल्याला माहिती देणे हा या निवेदनाचा (“गोपनीयता निवेदन”) हेतू आहे. एकत्रितपणे, या माहितीला “जॉब ॲप्लिकेशन डेटा” असे संबोधले जाते.

आपण या वेबसाईटमार्फत Corning ला सादर करत असलेला सर्व जॉब ॲप्लिकेशन डेटा हा Corning, न्यूयॉर्क, युएसए (USA) येथे स्थित असलेल्या Corning Incorporated यांच्याद्वारे संकलित केला जातो.

## आम्ही कोणकोणत्या प्रकारच्या माहितीवर प्रक्रिया करतो?

या गोपनीयता निवेदनामध्ये आपण Corningला सादर करत असलेला कोणताही आणि सर्व जॉब ॲप्लिकेशन डेटा समाविष्ट आहे, जसे की:

- नाव, पत्ता, ईमेल पत्ता, दूरध्वनी क्रमांक, किंवा इतर संपर्क माहिती;
- आपला रिझ्यूमे, CV किंवा मुख (कव्हर) लेटरमध्ये असलेली माहिती, जसे की पूर्वीच्या कामाचा अनुभव, शिक्षण, पारितोषिके आणि प्रमाणपत्रे, किंवा आपण आमच्या विचारार्थ पुरवत असलेली इतर माहिती;
- कोणत्या प्रकारची नोकरी पाहात आहात, इच्छित पगार, दुसरीकडे जाण्याची तयारी, किंवा नोकरीविषयक इतर प्राधान्यक्रम; आणि
- लागू असल्यास, संदर्भ व्यक्तींची नावे आणि संपर्क माहिती

संदर्भ व्यक्तींचा वैयक्तिक डेटा आम्हाला पुरवण्याआधी त्यांच्याकडून संमती मिळवण्याची जबाबदारी आपली आहे.

आपल्याला आपल्या पूर्वीच्या नियोक्त्याकडून मिळाली असू शकेल अशी गोपनीय, स्वामित्वहक्काची, किंवा पेटंट असलेली माहिती प्राप्त करण्याची Corningची इच्छा नाही आणि आपण ती Corning ला पुरवू नये.

## आपला डेटा कोण ॲक्सेस करू शकतो?

Corning मधील केवळ निवडक कर्मचारी – जसे की आपले संभाव्य भावी व्यवस्थापक, मानवी संसाधन विभागाचे कर्मचारी, आणि आयटी (IT) (केवळ देखभालीच्या उद्देशाने) – आणि आमच्या बाह्य सेवा पुरवठादारांकडील निवडक कर्मचारी, जे Corning ला भरती अर्जाच्या प्रशासनाकरिता साहाय्य करतात, हे आपला जॉब ॲप्लिकेशन डेटा ॲक्सेस करू शकतील.

Corning ही एक जागतिक संघटना आहे व तिचे व्यवसाय, कायदेशीर संस्था, आयटी (IT) प्रणाली, व्यवस्थापन संरचना आणि प्रक्रिया देशांच्या सीमा ओलांडणाऱ्या असतात. जॉब ॲप्लिकेशन डेटा इतर क्षेत्राधिकारामधील इतर Corning संस्थांना केवळ नोकरीचा विचार करण्याच्या हेतूने दिला जाऊ शकतो.

Corning हे कधीही कोणताही डेटा वर चर्चा केलेल्या व्यतिरिक्त कोणत्याही तृतीय पक्षाला आपल्या स्पष्ट अधिकारपत्राशिवाय देणार नाहीत.

## लागू असलेले कायदे.

Corning संस्था या Corningच्या जागतिक डेटा गोपनीयता धोरणाच्या[1] अनुसार आणि जॉब ॲप्लिकेशन डेटावर जेथे प्रक्रिया होईल अशा ठिकाण(णां)च्या सर्व लागू असलेल्या कायद्यांच्या अनुसार जॉब ॲप्लिकेशन डेटाची हाताळणी करेल. जेथे स्थानिक कायद्याला Corning च्या गोपनीयता धोरणाद्वारे स्थापित असलेल्यापेक्षा कमी संरक्षणाची गरज असेल, तेथे Corning आपल्या जॉब ॲप्लिकेशन डेटाची हाताळणी Corning च्या जागतिक डेटा गोपनीयता धोरणामध्ये रूपरेखित केल्यानुसार करेल, धोरण येथे उपलब्ध आहे http://www.corning.com/media/worldwide/global/documents/Global_Data_Privacy_policy.pdf.

**आपली निवड.**

आपला जॉब ॲप्लिकेशन डेटा पुरवणे ऐच्छिक आहे. तथापि, आपण आपल्या अर्जात विनंती करण्यात आलेला सर्व डेटा पुरवला नाही, तर उमेदवार म्हणून आपला विचार करण्याची आमची क्षमता मर्यादित होऊ शकते.

**जॉब ॲप्लिकेशन डेटा कोणत्या हेतूंकरिता वापरला जाईल?**

आपण पुरवत असलेला जॉब ॲप्लिकेशन डेटा हा Corning मधील (किंवा कोणत्याही संलग्न Corning संस्थेमधील) नोकरीसाठीच्या अर्जाचे मूल्यमापन करण्यासाठी, आपल्या माहितीची पडताळणी करण्यासाठी आणि संदर्भ तपासण्यासाठी, केवळ लागू असलेल्या कायद्यांतर्गत परवानगी असेल तरच आणि परवानगी असलेल्या मर्यादिपर्यंतच, आणि आपल्याशी संपर्क करण्यासाठी आणि आपल्याला आणखी करिअर संधींबाबत माहिती देण्यासाठी वापरला जाईल.

जर आपण Corning किंवा संलग्न Corning संस्थाकडे नोकरी स्वीकारली, तर संकलित केलेली माहिती आपल्या नोकरीविषयक नोंदींचा एक भाग बनेल आणि तो नोकरीच्या हेतूंकरिता वापरला जाईल.

**आम्ही आपला डेटा किती काळपर्यंत ठेवू?**

युनायटेड स्टेट्समध्ये नोकरी शोधणाऱ्या अर्जदारांकरिता जॉब ॲप्लिकेशन डेटा हा आमच्या अर्जदार डेटाबेसमध्ये आपण सर्वात अलिकडे जॉब ॲप्लिकेशन डेटा सादर केल्यापासून तीन (3) वर्षांकरिता साठवला जातो. युनायटेड स्टेट्सबाहेर नोकरी शोधणाऱ्या अर्जदारांकरिता जॉब ॲप्लिकेशन डेटा हा आपण सर्वात अलिकडे जॉब ॲप्लिकेशन डेटा सादर केल्यापासून दोन (2) वर्षांकरिता, किंवा स्थानिक नियमना(नां)द्वारे निर्धारित केल्यानुसार त्याहून कमी काळाकरिता साठवला जाईल.

आपण खाली स्पष्ट केल्यानुसार कोणत्याही वेळी आपल्या जॉब ॲप्लिकेशन डेटापर्यंत पोहोचू शकता, तो दुरुस्त करू शकता किंवा तो डिलिट करू शकता.

**आपले अधिकार.**

आपण कोणत्याही वेळी Corning च्या नोकरी अर्ज वेबपृष्ठामध्ये www.corning.com/careers लॉग इन करून आपल्या जॉब ॲप्लिकेशन डेटा ॲक्सेस करू शकता, तो दुरुस्त करू शकता किंवा पूर्वीचे अर्ज काढून टाकू शकता. आपण privacy@corning.com यांना विनंती पाठवून आपल्या जॉब ॲप्लिकेशन डेटाच्या हाताळणी संबंधित प्रश्न विचारण्याबाबत विनंती करू शकता.

[1] येथे उपलब्ध आहे http://www.corning.com/media/worldwide/global/documents/Global_Data_Privacy_policy.pdf

आपण privacy@corning.com येथे ईमेल पाठवून किंवा http://www.corning.com/worldwide/en/privacy-policy.html येथे भेट देऊन आपल्या जॉब ॲप्लिकेशन डेटावर केली जाणारी प्रक्रिया आणि Corning चे सर्वसाधारण गोपनीयता धोरण यांच्या संदर्भात आणखी माहितीची विनंतीदेखील करू शकता.

**आपली संमती.**

आपला जॉब ॲप्लिकेशन डेटा सादर करून आपण त्या माहितीवर या गोपनीयता निवेदनानुसार प्रक्रिया करण्याला आपली संमती देत आहात (ज्यामध्ये आपल्या जॉब ॲप्लिकेशन डेटाचे जगभरात स्थलांतर करण्याचा समावेश होतो).